दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक १४ । बुधवार ३० सप्टेंबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## शाळकरी मुलांनी भांडणात काढला कोयता

### वाडियापार्कजवळ घडली घटना; शाळकरी मुले ताब्यात



**शाळेतील विद्यार्थ्यांचे दप्तर तपासण्याची गरज**

शाळकरी मुलांमध्ये गुन्हेगारी वाढीस लागल्याने त्यामध्ये शाळेचीही बदनामीचे प्रकार वाढू लागले आहे. सहा महिन्यांपुर्वी असेच एका शाळेतील मुलाच्या वादातून खूनाची घटना घडल्याने त्या शाळेने नंतर प्रत्येक विद्यार्थ्याचे दप्तर तपासण्यास सुरुवात केली आहे. तशीच पध्दत प्रत्येत शाळेतील शिक्षकांवर आली असून गुन्हेगारीच्या घटना टाळण्यासाठी शिक्षकांना मुलांचे दप्तर तपासणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे.

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वाडियापार्क येथील एका शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये वादातून थेट कोयताचा मारामाऱ्यासाठी काढल्याची घटना आज दि.३० रोजी दुपारी काढल्याची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. भर दुपारी झालेल्या शाळकरी मुलांच्या या मारामाऱ्यामुळे वाडियापार्क चौकात बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

वाडियापार्क चौकात तिन वेगवेगळया नामांकित शाळा आहेत. मात्र त्यापकी एका नामवंत शाळेतील इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांमध्ये वाद झाले. (वादाचे कार स्पष्ट समजू शकले नाही) सदरचे वादानंतर मुलांच्या एका गटाने एका मुलाला वाडियापार्क जवळ गाठून त्याला मारहाण केली. त्यापैकी एकाने मारामाऱ्यासाठी त्याने शाळेतील दप्तारामध्ये ठेवलेला कोयताच बाहेर काढला. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. मात्र एका तरुणाने कोयला मारामाऱ्यासाठी बाहेर काढल्याने नागरिकांचीही मोठी गर्दी झाली होती.

यावेळी तात्काळ कोतवाली पोलिसांना पाचारण करण्यात आले. त्यांनी चौघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. त्यांची कसुन चौकशी सुरु असून ज्या तरुणाने कोयता आणला आहे त्यालाही ताब्यात घेतले असून या घटनेत तरुणांनी गुन्ह्यात वापरलेला कोयता आणि २ दुचाक्या ताब्यात घेतल्या आहेत. दरम्यान दुपारी उशीरा कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु होती.



जिल्हा बँकेच्या उमेदवारी अर्ज घेताना विधानपरिषद सभापती ना. प्रा राम शिंदे.



जिल्हा बँकेच्या उमेदवारी अर्ज घेताना विधानपरिषद सभापती खा. निलेश लंके.

## नेत्यांच्या बोलण्यात एकसूत्रता नसल्याने अर्ज घेण्यास गर्दी

### सभापती प्रा. शिंदेंचा दावा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याची चर्चा सुरू असली तरी संबंधित सर्व प्रमुख नेत्यांच्या बोलण्यामध्ये एकसूत्रता राहिलेली नसल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे उमेदवारी अर्जांसाठीची गर्दी पाहता सभासदांनी स्वतःहून फॉर्म घेण्यास सुरुवात केली असल्याचे दिसते आहे, असा दावा विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज येथे केला. सभासदांनी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज घेतलेले आहेत. ५४१ फॉर्म आत्तापर्यंत सभासदांनी घेतलेले आहेत. यावरून निवडणूक बिनविरोध होणार की नाही, हे स्पष्ट होतं, असे सूचक भाष्यही त्यांनी केले. जर एखाद्या गोष्टीचा निर्णय करणार असतील तर सर्वांना सोबत घेतलं पाहिजे. सर्वांना विचारात घेऊन करायला हवं, असे भाष्यही त्यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या २१ जागांसाठीची निवडणूक प्रक्रिया सध्या सुरू आहे. ही निवडणूक लढवण्याचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी मागेच जाहीर केले होते व त्याअनुषंगाने जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेत्यांच्या भेटीगाठीही त्यांनी घेतल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, सभापती प्रा. शिंदे यांनी आज बुधवारी (दि.३० सप्टेंबर) सकाळी १०.३० वाजता जिल्हा बँक निवडणुकीचा कोरा उमेदवारी अर्ज घेतला. यासाठी ते जिल्हा बँकेच्या चाहुराणा-मार्केट यार्ड शाखेत आले होते. आता ते प्रत्यक्ष उमेदवारी कधी दाखल करतात याची उत्सुकता आहे.

उमेदवारीचा अर्ज घेतल्यानंतर सभापती प्रा. शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक आशिया खंडातील सर्वात मोठी बँक आहे. तिचे कार्यक्षेत्रही मोठे आहे. बँकेच्या ठेवीदेखील मोठ्या प्रमाणात आहेत आणि ते चांगलेच आहे. त्यामुळे सर्वसामान्य शेतकर्यांना पीक कर्ज वितरणही चांगले झाले आहे. बँकेची आर्थिक स्थिती चांगली आहे आणि तिचे कामही चांगले आहे. त्यामुळे ठेवीदार आणि शेतकर्यांचे आर्थिक संरक्षण करणे व त्यांना पाठबळ देणे आपले काम आहे. दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मागणी केल्याबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने मदत करण्याची तयारी दर्शवली आहे. त्याचाही फायदा बँकेला निश्चित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**तब्बल ६०० जणांनी उमेदवारी अर्ज नेले**

तीन दिवसांमध्ये साधारण ६०० जणांनी उमेदवारी अर्ज नेले आहेत. त्यामध्ये ना. प्रा. राम शिंदे यांच्यासह खासदार निलेश लंके, दत्ता पानसरे यांचा समावेश आहे. तर आमदार मोणिका राजळे, आ. अक्षय कर्डिले, सचिन जगताप यांनी दुसऱ्यांमार्फत अर्ज नेले आहे. तर उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्यांमध्ये राहुज जगताप, मनिषा गुंड, आ. प्राजक्त तनपुरे, यांच्यासह आदींनी दाखल केले आहेत.

पालकमंत्र्यांची भूमिका प्रतीक्षेत : जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक लढवायची आहे. पण बिनविरोधच्या चर्चांमुळे माझ्या मनामध्ये अजून तोच प्रश्न निर्माण झाला आहे. पालकमंत्र्यांची भूमिका अजूनही स्पष्ट झालेली नाही. महायुतीमध्येही पालकमंत्र्यांनी भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यांच्या मतानुसार त्यांना बिनविरोधसंदर्भातील बैठकीबाबत काही माहीत नाही असेही ना. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले आहेत. शिवसेना एकीकडे बैठक घेत आहे आणि म्हणून त्यासंदर्भात सभापती म्हणून मला भूमिका घेण्याची वेळ अजून आली की नाही असा प्रश्न मला पडला आहे, असे भाष्य करून सभापती प्रा. शिंदे म्हणाले, संगमनेर येथे मीटिंग झाल्यानंतर मला माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचा फोन आला होता. माजी मंत्री शंकरराव गडाख यांचाही फोन झाला होता. आ. विवेक कोल्हे यांचाही फोन आला होता. मात्र, त्यानंतर यासंदर्भात कुठलीही चर्चा माझ्यासोबत कोणीही केलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

राखीव पदांबाबत भाष्य ■ पान ४ वर

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीत संजय कुमार कर्नावट यांचा अर्ज दाखल

### बिगर शेती संस्था मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेडच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी पारनेर तालुक्यातील खडकवाडी येथील संजय कुमार कर्नावट यांनी बिगर शेती संस्था मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

कर्नावट यांच्या उमेदवारी अर्जावर मांडवे खुर्द येथील सामाजिक कार्यकर्ते गागरे भाऊसाहेब शंकर यांनी सूचक म्हणून, देवदैठण येथील सामाजिक कार्यकर्ते येवले सबाजी अंशाबापू यांनी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी करून पाठिंबा दर्शविला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या किसान ■ पान ४ वर

## विळद घाटातील वृध्दाश्रमात वृध्दांची हत्या करणारा आरोपी अटकेत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** विळद घाटातील मातोश्री वृध्दाश्रम येथे दोन वृध्दांची हत्या करणाऱ्या राजू तुकाराम घुले ( वय ५४,रा. वृध्दाश्रम, विळद) याला एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे.

दि. २६ सप्टेंबर रोजी राजू घुले याने दत्ताद्धय शंकर हारके व मंकळेश्वर बगाबुरात हेने (रा. वृध्दांश्रम) यांची हत्या केली होती. तर संतोष भिवचराज पिरंगळ,लिंबराज दामोदर फिसके, साहेबराव दगडू भवर, बाळासाहेब अंबादास घाडगे, गोरख हरिभाऊ फुंदे, गणेश छबु घोडके यांच्यावर हल्ला करुन गंभीर जखमी केले होते. तेव्हापासून पोलिस त्याच्या मागावर होते दि. ३० रोजी एमआयडीसी पोलिसांनी राजू घुले याला अटक केली आहे. या संदर्भात दिलीप मांगिलाल चोरडिया यांनी फिर्याद दिलेली आहे. सदरची कारवाई ही ■ पान ४ वर

## मोहटादेवी नवरात्रोत्सवासाठी प्रशासन सज्ज

### अतिक्रमणे हटविण्याचे आदेश; २४ तास वीज, पाणी, आरोग्य व बससेवेचे नियोजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पाथर्डी –** श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचा शारदीय नवरात्र महोत्सव रविवार, ११ ऑक्टोबर ते रविवार, २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून भाविकांच्या सुविधांसाठी विविध विभागांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. उपविभागीय अधिकारी तथा श्री मोहटादेवी यात्रा नोडल अधिकारी प्रसाद मते यांच्या अध्यक्षतेखाली देवस्थानच्या सभागृहात बैठक झाली.

महोत्सव काळात भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, यासाठी सर्व शासकीय विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, अशा सूचना मते यांनी दिल्या. देवस्थानच्या वतीने आवश्यक कामांची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी दिली.

रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविण्याचे आदेश

पाथर्डी शहर तसेच मोहटादेवी मंदिराकडे येणाऱ्या सर्व मार्गांवरील अतिक्रमणे हटविण्याचे आदेश बैठकीत देण्यात आले. मोहटादेवी रस्त्यावरील वनविभागाच्या जागेवरील अतिक्रमणाबाबत संबंधित विभागाने कारवाई न केल्याने वनविभागाला नोटीस देण्याचे आदेश मते यांनी दिले. पाथर्डी-मोहटे रस्ता, पालखी मार्ग यासह प्रमुख मार्गांवरील खड्डे बुजविणे, साईडपट्ट्यांची दुरुस्ती, आवश्यक ठिकाणी गतिरोधक उभारणे आणि वाहतुकीला अडथळा होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**गाभारा दर्शन बंद; सुरक्षेचा कडेकोट बंदोबस्त**

शारदीय नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत गाभारा दर्शन बंद राहणार असल्याची माहिती देवस्थानच्या वतीने देण्यात आली. घटस्थापना आणि पालखी मिरवणुकीसाठी अतिरिक्त पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. महिला पोलिसांसह वाहतूक पोलिस, एसआरपी, गृहरक्षक दल आणि शीघ्रकृती दलाची नियुक्ती करण्यात येणार आहे.

**२४ तास आरोग्यसेवा व वीजपुरवठा**

उत्सव काळात २४ तास वीजपुरवठा, पुरेशी प्रकाश व्यवस्था, पिण्याचे पाणी, अग्निशमन वाहन, फिरते शौचालये, रुग्णवाहिका आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालय व आरोग्य विभागाच्या वतीने २४ तास ओपीडी सुरू ठेवण्याबरोबरच पिण्याच्या पाण्याची तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**एसटीच्या जादा बसेस**

महोत्सव काळात भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता ■ पान ४ वर

## श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट आयोजित छत्रपती शिवाजी महाराज कथा सोहळ्याचा आ. संग्रामभैय्या जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत शानदार शुभारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टने नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्स मध्ये आयोजित केलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याचा शुभारंभ आ. संग्रामभैय्या जगताप यांच्या प्रमुख उपस्थित उपस्थितीत मोठ्या थाटात करण्यात आला. कथेचे प्रवक्ते प. पू.स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज, ट्रस्टचे अध्यक्ष नंदलालजी मणियार, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव सुरेश चांडक, कोषाध्यक्ष मगनभाई पटेल आदी मान्यवरांनी दीप प्रज्वलन केल्यानंतर स्वामींना सन्मानित केले. शिव भारत या ग्रंथाचे पूजन आणि शिवरायांची आरती करून कथेस शुभारंभ करण्यात आला. नंदनवन उद्योग समूहाचे संजय जाधव यांनी स्वागताध्यक्ष या नात्याने स्वामींचे आणि उपस्थित मान्यवरांसह श्रोतृवृंदांचे स्वागत केले.

श्री रामकृष्ण इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे लेझीम आणि ढोल पथकाने तालासुरात वादन करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. आ.जगताप यांनी श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टने शहरात प्रथमच छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन केले आहे. युवकांनी या सोहळ्याचा मोठ्या संख्येने लाभ घेऊन शिवरायांचे गुण आत्मसात केले तर त्यांचा जीवनप्रवास निश्चितच चांगला होईल, असा विश्वास व्यक्त केला.

श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टचे अध्यक्ष नंदलालजी मणियार यांनी भारतीय संस्कृती, अध्यात्म, धर्म, राष्ट्र आणि भक्तीचा संदेश देणाऱ्या स्वामी गोविंददेव गिरीजींची शासनाने अयोध्या येथील श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास साठी महासचिव म्हणून नियुक्ती केल्याबद्दल शासनाचे आणि स्वामींचे अभिनंदन केले. प.पू.डोंगरे महाराजांच्या मार्गदर्शनाखाली श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टचा कार्यारंभ झाला आहे. रामकृष्ण परिवार संस्काराची खाण आहे. युवा पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र समजणे काळाची गरज आहे, हे ओळखून कथा सोहळ्याचे आयोजन केले, असे सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा जयजयकार करत

स्वामींनी कथा निरूपणाचा शुभारंभ केला.

ते म्हणाले, आपल्या जिल्ह्यातील नेवासा येथील कविंद्र परमानंद हे शिवाजी महाराजांसोबत राहिलेले आहेत. त्यांनी लिहिलेला शिवभारत हा ग्रंथ तंजावरच्या ग्रंथालयात उपलब्ध झाला आहे. शिवाजी महाराजांची संमती घेऊन त्यांनी हा ग्रंथ लिहिला, हे विशेष होय. विश्वाचे मांगल्य साकारणारा हिंदू धर्म केवळ शिवरायांमुळे टिकला. पापी यवनांचा नायनाट करत शिवरायांनी हिंदवी साम्राज्य उभे केले. मोगलांचे आक्रमण देशातील संस्कृतीचा संपूर्ण नाश करण्यासाठी होते. हिंदूंनी कधीही कोणावर आक्रमण केले नाही की, कोणालाही शत्रू समजले नाही, ही वस्तुस्थिती आहे. सर्वांचे कल्याण व्हावे, अशी प्रार्थना करणारी भारतीय परंपरा आहे. विश्व मांगल्याचा विचार हा भारत देशाचा स्थायीभाव आहे.

मंदिरे फोडणे, गायींना रस्त्यावर ओढून आणत कापणे, महिलांना पळवणे असा अत्याचार शतकानुशतके आपल्या देशावर चालला. समर्थ रामदास स्वामींनी या काळरात्रीचे यथार्थ वर्णन केले आहे.

सरदार मालोजीराजे यांचे उत्तम संस्थान होते. त्यांचे सुपुत्र शहाजीराजे यांनी ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### स्नेहबंधच्या गणरायाच्या आरतीचा मान पोलिस अधिकाऱ्यांना!



अहिल्यानगर - येथील स्नेहबंध सोशल फौंडेशन व पियुष डिजिटल कार्यालयात श्री गणरायाचा गणेशोत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित आरती सोहळ्याला पोलिस प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली. पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या हस्ते श्री गणरायाची आरती करण्यात आली. गणरायाच्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात झालेल्या आरतीमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रांतील मान्यवरांना आरतीचा मान देण्याची परंपरा स्नेहबंध सोशल फौंडेशनतर्फे जपली जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून यंदा पोलिस अधिकाऱ्यांना आरतीचा मान देण्यात आला.यावेळी स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, सौ. सुशीला शिंदे उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. आरतीनंतर डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांचा पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. गणेशोत्सवाच्या निमित्ताने झालेल्या या आगळ्यावेगळ्या सत्कारामुळे उपस्थितांमध्येही उत्साहाचे वातावरण होते. पोलिस प्रशासन आणि सामाजिक संस्थांमधील संवाद व सामाजिक बांधिलकी अधोरेखित करणारा हा सोहळा ठरला.

### जागतिक पर्यटन दिनी चांदबिबी महाल परिसरात वृक्षारोपण अन् स्वच्छता अभियान

अहिल्यानगर- जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने शहराच्या ऐतिहासिक चांदबिबी महाल परिसरात वृक्षारोपण व स्वच्छता अभियान राबविण्यात आले. ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याबरोबरच परिसराचे पर्यावरण संवर्धन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. या उपक्रमात चांदबिबी महाल परिसरात वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच परिसरातील स्वच्छता करून पर्यटकांना स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक परिसर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. ऐतिहासिक स्थळे ही केवळ पर्यटनाची केंद्रे नसून आपल्या इतिहासाची आणि संस्कृतीची ओळख असल्याने त्यांचे संवर्धन करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, विकास भिंगारदिवे, जहीर सय्यद, सचिन चोपडा, अशोक पराते, सुंदरराव पाटील, सर्वेश सपकाळ, ताराचंद ठोकळ, विलास आहेर, दिलीप ठोकळ, अशोक लोंढे, दिलीप गुगळे, अभिजीत सपकाळ, दीपकराव धाडगे, मनोहर दरवडे, योगेश चौधरी, जालिंदर अळकुटे, नवनाथ वेताळ, अविनाश जाधव, शेषराव पालवे, जोगिंदरसिंग, सखाराम अळकुटे, अविनाश पोतदार, सुभाष पेंढुरकर, सरदारसिंग परदेशी, इंजि. अनिल सोळसे, दीपकराव घोडके, उमाशंकर सिंग, दीपकराव मेहतानी, दीपक अमृत, विशाल भामरे आदींसह ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य संजय भिंगारदिवे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागात भांडारपाल म्हणून तब्बल ३० वर्षे सेवा बजावली. त्यांच्या प्रदीर्घ, प्रामाणिक व सेवाभावी कार्याची दखल घेत जागतिक पर्यटन दिनाच्या कार्यक्रमात हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने त्यांचा सेवापूर्तीबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन त्यांना गौरविण्यात आले.

### उद्योजक भानुदास शिंदे यांचे निधन



नगर - आष्टी तालुक्यातील ठोंबळसांगवी रहिवासी व सुरत (गुजरात) येथील कापड उद्योग क्षेत्रातील प्रिटिंग मास्टर भानुदास गणपत शिंदे (वय ७३) यांचे नुकतेच निधन झाले. लहानपणी ते रोजगारासाठी सुरत येथे गेले होते. कापड गिरणीमधील सर्व तंत्र अवगत करून ते प्रिटिंग मास्टर झाले. त्यांनी अनेक कंपन्यामध्ये डिझाईन मास्टर म्हणून काम केले. सुरतमधील सचिन जीआयडीसीचे ते संचालक होते. त्यांच्या पार्थिवावर मूळगावी ठोंबळसांगवी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक संदीप शिंदे, गणेश शिंदे यांचे ते वडील होत.

# जवाहर विद्यालयात ''साहित्यिक आपल्या भेटीला'' उपक्रम उत्साहात

**विद्यार्थी भारावले साहित्य व काव्य विश्वाने । विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होवून वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठीचा उपक्रम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चांदा येथे माजी विद्यार्थी संघाचे संतोष कानडे यांच्या संकल्पनेतून ''साहित्यिक आपल्या भेटीला'' हा उपक्रम राबविण्यात आला. जवाहर माध्यमिक विद्यालय व माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या या उपक्रमा अंतर्गत ज्येष्ठ साहित्यिक सुभाष सोनवणे यांचे व्याख्यान व काव्य वाचनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कवि सोनवणे यांच्या ''जीवनाची वारी'' या कवितेला सर्वांनी भरभरून प्रतिसाद दिला. यावेळी शब्दगंध साहित्य परिषदचे प्रा. डॉ. किशोर धनवटे व प्रा.डॉ.दिगंबर सोनवणे यांच्या माध्यमातून फिरते वाचनालय उपक्रम अंतर्गत''शब्दगंध सामूहिक पुस्तक वाचन उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यालयातील इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध साहित्य प्रकारातील पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली.

यावेळी प्रा. डॉ. किशोर धनवटे यांनी पुस्तकांशी मैत्री करा असा संदेश दिला. माजी विद्यार्थी संघाचे संतोष कानडे यांनी उपक्रम आयोजनामागचा हेतू सांगताना स्पष्ट केले की, विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होवून वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी.

# वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूरने ४ वोक्हाथॉन आणि वेलनेस फिएस्टाच्या माध्यमातून हृदयाच्या आरोग्याबाबत जनजागृती केली



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरने जागतिक हृदय दिनानिमित्त आरोग्यावर आधारित उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले. लोकांनी निरोगी जीवनशैली स्वीकारावी आणि हृदयाच्या आरोग्याला प्राधान्य द्यावे, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. या कार्यक्रमात विविध महाविद्यालये, कॉर्पोरेट संस्था, हॉस्पिटलमधील कर्मचारी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात मोठ्या उत्साहात झाली. यावेळी ४ वोक्हाथॉन, झुंबा सत्र, योग आणि वेलनेस सत्र तसेच टोट बॅग पेंटिंग अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शारीरिक हालचाल, निरोगी सवयी आणि आजार होण्यापूर्वीच आरोग्याची काळजी घेण्याचे महत्त्व याबाबत जनजागृती करण्यासाठी सहभागी एकत्र आले.

वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूरचे सीनियर इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. नितीन तिवारी यांनी सांगितले, ''हृदयाच्या आरोग्याचा विचार आजार झाल्यानंतरच करायला हवा असे नाही. नियमित व्यायाम, संतुलित जीवनशैली, वेळेवर आरोग्य तपासणी आणि हृदयविकाराच्या जोखमीच्या घटकांबाबत जागरूकता यामुळे हृदयविकार टाळण्यास मोठी मदत होऊ शकते. वोक्हाथॉनसारखे कार्यक्रम लोकांना निरोगी हृदयासाठी पहिले पाऊल उचलण्यास प्रोत्साहित करतात.'' वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूरचे सीनियर सीव्हीटीएस डॉ. सुमित नारंग यांनी सांगितले, ''निरोगी हृदयासाठी रोजच्या जीवनातील निरोगी सवयी महत्त्वाच्या आहेत. व्यायाम, योग्य आहार, तणावाचे व्यवस्थापन आणि नियमित आरोग्य तपासणी हे हृदयाच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. आज दिसून आलेला उत्साह नक्कीच प्रेरणादायी आहे आणि हृदयविकार टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग असायला हवेत, याची आठवण करून देतो.''

वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूरचे इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. अमित बल्लमवार म्हणाले, ''हृदयविकार कोणत्याही वयोगटातील व्यक्तीला होऊ शकतो. त्यामुळे हृदयविकाराची लक्षणे वेळीच ओळखण्यासाठी आणि तो टाळण्यासाठी जागरूकता महत्त्वाची आहे. प्रत्येकाने आपल्या हृदयाच्या आरोग्याशी संबंधित जोखीम घटक समजून घ्यावेत आणि धोक्याची लक्षणे दुर्लक्षित करू नयेत. विशेषतः मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा किंवा कुटुंबात हृदयविकाराचा इतिहास असलेल्या व्यक्तींनी नियमित तपासणी करणे अधिक महत्त्वाचे आहे.'' वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूरचे सेंटर हेड डॉ. सौरभ नागर यांनी सांगितले, ''वोक्हार्ट हॉस्पिटल्समध्ये आम्ही दरवर्षी जागतिक हृदय दिन साजरा करतो. लोकांनी आपल्या हृदयाच्या आरोग्याची अधिक चांगली काळजी घ्यावी, यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे हा यामागचा उद्देश आहे. यावर्षी फिटनेस, वेलनेस आणि विविध सर्जनशील उपक्रमांच्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रातील लोक एकत्र आले. महाविद्यालये, कॉर्पोरेट संस्था आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग हा प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व वाढत असल्याचे दर्शवतो.'' कार्यक्रमादरम्यान सहभागींसाठी मोफत आरोग्य तपासणी देखील आयोजित करण्यात आली. यामुळे सहभागींना आवश्यक आरोग्य तपासण्या करून घेता आल्या आणि आपल्या आरोग्याबाबत अधिक जागरूक होता आले. ४ वोक्हाथॉनमध्ये सहभागींचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. तसेच झुंबा आणि योग सत्रांमुळे कार्यक्रमात फिटनेस आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. टोट बॅग पेंटिंग उपक्रमातून सहभागींना आपली सर्जनशीलता दाखवण्याची आणि हृदयाच्या आरोग्याबाबतच्या जनजागृती मोहिमेत सहभागी होण्याची संधी मिळाली. सहभागींचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सर्व सहभागींना प्रमाणपत्रे आणि स्नॅक्स देण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या निमित्ताने वोक्हार्ट ब्रँडच्या टी-शर्ट आणि कॅप्सचे वाटप करण्यात आले. दरवर्षी जागतिक हृदय दिनानिमित्त विविध उपक्रम राबवून वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूर हृदयाचे आरोग्य हे आपल्या रोजच्या सवयींपासून सुरू होते, हा संदेश देत आहे. तसेच, आजपासूनच आरोग्याची काळजी घेणे आणि आवश्यक खबरदारी घेणे यामुळे भविष्यात अधिक चांगले आणि निरोगी जीवन जगण्यास मदत होऊ शकते.

# छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेची ४८ वी वार्षिक सभा उत्साहात

**१२ कोटींचे लाभ सभासदांच्या खात्यावर वर्ग; २५० गुणवंत विद्यार्थ्यांचा व सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा गौरव**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यातील केवळ ग्रामपंचायत अधिकारी संवर्गासाठी लोकशाही तत्त्वावर कार्यरत असलेल्या छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर या संस्थेची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच निशा लॉन, केडगाव, अहिल्यानगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन संतोष साबळे होते. यावेळी सुमारे ८०० सभासद सभेस उपस्थित होते.

सभेच्या निमित्ताने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर सौ. ज्योती अमोल गाडे, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके आणि महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघाचे जिल्हाध्यक्ष किशोर जेजुरकर, चेअरमन संतोष साबळे यांच्या हस्ते २५० गुणवंत विद्यार्थ्यांचा, त्यांच्या पालकांचा तसेच सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.

१२ कोटींचे लाभ सभासदांच्या खात्यावर वर्ग

संस्थेचे चेअरमन संतोष साबळे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा सादर करताना सांगितले की, संस्थेचे एकूण १,३२५ सभासद असून, वसूल भागभांडवल १४ कोटी रुपये आहे. संस्थेकडे ३८ कोटी रुपयांचे फंड, २०५ कोटी रुपयांच्या ठेवी, तर सभासदांना एकूण २३४ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. संस्थेची एकूण गुंतवणूक १८ कोटी रुपये असून, स्थावर मालमत्ता १ कोटी ५ लाख रुपयांची आहे. संस्थेने सर्व तरतुदी वजा जाता ३१ मार्च २०२६ अखेर १५० लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळविला आहे.संस्थेचे व्हाईस चेअरमन सुधीर उंडे यांनी संस्थेच्या आर्थिक स्थितीची माहिती दिली. मानद सचिव गोटीराम मडके यांनी सभासदांना लाभांश, कायमठेव व्याज व व्याज परतावा (व्याज रिबेट) या स्वरूपात एकूण १२ कोटी रुपये सभासदांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आल्याची माहिती दिली.

संचालक मंडळ व मान्यवरांची उपस्थिती

यावेळी संस्थेचे चेअरमन संतोष साबळे, व्हाईस चेअरमन सुधीर उंडे, मानद सचिव गोटीराम मडके तसेच माजी चेअरमन तथा संचालक प्रताप साबळे, हरीश भालेराव, ज्ञानेश्वर सुर्वे, सदानंद डोखे, सुधाकर पगारे, श्रीकांत साळे,. रवि देशमुख, प्रशांत सातपुते, नवनाथ गोरे, ज्ञानदेव अडसुरे, किशोर जेजुरकर, संतोष खंडागळे, श्रीमती संगीता परोडकर , श्रीमती सुरेखा लांडगे , श्रीमती अर्चना गुंड-, प्रविण इल्हे, राजेंद्र ढाळे ज्ञानदेव शिंदे उपस्थित होते.

संघटनेच्या जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

पतसंस्थेच्या वार्षिक सभेनंतर महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघ, जिल्हा शाखा अहिल्यानगर या संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा जिल्हाध्यक्ष श्री. किशोर सुगंधा किसनराव जेजुरकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष कुंडलिकराव भगत यांचा सेवा निवृत्त झाल्याने सन्मान करण्यात आला, यावेळी पोपटराव रासकर, प्रमोद कानडे, कैलास तरटे, सुनील काळे, श्रीमती वैशाली बोरुडे, श्रीमती सीमा नजन, श्रीमती संगीता डावरे, उपेंद्र पोटे, देवेंद्र वारुळे, राहुल गांगई, श्रीमती अश्विनी व्यवहारे, श्रीमती मनीषा तोडमल, श्रीमती वैशाली सानप, अनिल लवांडे, संदीप रोटे,. सुभाष कापसे, राजेंद्र कंदलकर,. अमित कोल्हे, रमेश सुपेकर, हितेश दुमणे, मधुकर पगारे, लहान थिने, . राजू दराडे, बाजीराव पवार, ताराचंद गाडे, प्रेमचंद वाघमारे, भारत देशमुख, श्रीमती सपना कांबळे, श्रीमती ललिता बौद्रे, श्रीमती अनिता माळी, राजेंद्र बागले, तुळसीराम दिनकर, प्रभाकर चव्हाण, प्रदीप आसने, प्रशांत बरबडे, प्रमोद म्हस्के, बबनराव बहिर, रोहिदास कापरे, साहेबराव घोरपडे, विशाल झावरे, अशोक जगदाळे, तुकाराम भांगे, सखाहरी थोरात, संदीप शिंदे, बाबासाहेब भोसले, राजू भालदंड, अनुसुयाकुमार उन्हाळे, राजेंद्र आहेर, अमोल भवर, रफिक ताबळी, शिवाजी धांडे, दास तिपोळे, सचिन थोरात व पोपटराव गावडे यांच्यासह जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकारी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**एसआयआरच्या माध्यमातून मतचोरीचा आरोप**

# मुख्य निवडणूक आयुक्तांना बडतर्फ करून अटक करण्याची काँग्रेसची मागणी

**अहिल्यानगर शहर जिल्हा काँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण () एसआयआर प्रक्रियेच्या माध्यमातून मतदारांची नावे वगळून मतचोरी केली जात असल्याचा आरोप करत अहिल्यानगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाई करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे तसेच अटक करावी, अशी मागणी करून निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. निवडणूक प्रक्रिया स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक असणे आवश्यक असून, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये संशय निर्माण होऊ नये, अशी भूमिका काँग्रेसने निवेदनातून मांडली.

निवेदनात म्हटले आहे की, निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाची प्रक्रिया सुरू असून, या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे वगळली जात असल्याचा काँग्रेसचा आरोप आहे. तसेच मतदार यादीतील फेरफाराबाबत विविध माध्यमांमध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्याचा दाखलाही निवेदनात देण्यात आला आहे.

काँग्रेसने पश्चिम बंगालसह काही राज्यांमधील मतदार यादीतील नावांबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांचा उल्लेख करत, मतदारांच्या नावांची वगळणी आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी केली आहे. निवडणूक प्रक्रिया आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण समवेत फिरोज खान, मयूर पाटोळे, सुनील शेत्रे, माजी नगरसेवक फैयाज शेख, यश चव्हाण, अभिषेक शिंदे, समर्थ व्यवहारे, अभिजीत कांबळे, श्यामराव वागस्कर, स्वप्निल शिंदे, डॉ. बापू चंदनशिवे, रियाज शेख, विवेक कसबे, राजेंद्र कर्डिले, रवी सातपुते, अकील सय्यद यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्यानगरमध्ये शालेय रायफल शूटिंगचा थरार

**खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग; अचूक नेमबाजीने खेळाडूंनी गाजवला मैदान । पदक विजेत्या नेमबाजांचा गौरव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर महानगरपालिका आणि अहिल्यानगर शूटिंग स्पोर्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय मनपा रायफल शूटिंग स्पर्धा २०२६-२७ उत्साहात पार पडली. भिंगार येथील इन्फिनिटी स्पोर्ट शूटिंग क्लब येथे झालेल्या या स्पर्धेत अहिल्यानगर शहरातील तब्बल ७४ शालेय खेळाडूंनी सहभाग नोंदवत आपल्या नेमबाजी कौशल्याचे दर्शन घडविले.

स्पर्धेचे उद्घाटन नगर शहराचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते झाले. विविध गटांमध्ये झालेल्या या स्पर्धेत खेळाडूंनी अचूक नेम साधत उत्कृष्ट कामगिरी केली. पदक विजेत्या खेळाडूंचा गौरव अहिल्यानगरचे अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांच्या हस्ते मेडल व ट्रॉफी देऊन करण्यात आला.



स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करून पदके मिळविणाऱ्या खेळाडूंचा मेडल व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सी.ए. ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे, माजी नगरसेविका मनीषा काळे, प्रवीण धायतडक (सेल्फ केअर फाउंडेशन), लेफ्टनंट कर्नल ध्रुव नासीर, उद्योजक हरीश नय्यर, प्रियदर्शनी पब्लिक स्कूलच्या प्राचार्य अंजली बोधक, बाळासाहेब खोमणे, संजय साठे आणि घनश्याम सानप यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, वरिष्ठ कक्ष अधिकारी लाड, सोल मॅडम, आमदार संग्राम जगताप, खासदार नीलेश लंके, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, क्रीडा अधिकारी प्रियंका खिंडारे, संतोष वाबळे, कोमल वाकळे, व्हिन्सेंट फिलिप्स तसेच सर्व पालकांनी शुभेच्छा दिल्या. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांनी पंच म्हणून जबाबदारी पार पाडली.

शालेय जिल्हास्तरीय मनपा रायफल शूटिंग स्पर्धा २०२६-२७ मधील विजेते पुढीलप्रमाणे:-

एअर पीप साइड रायफल प्रकारात मुलांच्या १४ वर्षे वयोगटात पृथ्वीराज देशमुख व आयुष राऊत, १७ वर्षे वयोगटात चैतन्य गंधडे, साईराज बागुल व पार्थ वाणी, तर १९ वर्षे वयोगटात शिवेंद्र नेमणे व आयुष कोहोक यांनी पदक मिळवले.मुलींच्या १४ वर्षे वयोगटात कार्तिकी कोकाटे व श्रुती बडेकर, १७ वर्षे वयोगटात पंकजा आटोळे, मुग्धा राजापूरे व मानसी वाबळे, तर १९ वर्षे वयोगटात किर्ती चक्रवर्ती, राजनंदिनी काळे व राजलक्ष्मी घडेकर यांनी पदक पटकावले.एअर पिस्तूल प्रकारातील मुलांच्या १४ वर्षे वयोगटात आयुष इंगळे व शिवाश धामणे, १७ वर्षे वयोगटात अद्वय धायतडक, युवराज ठाणगे व प्रेम वाणी, तर १९ वर्षे वयोगटात तन्मय वाघ, आदित्य बुचुडे व समर कुसमुडे यांनी पदक मिळवले. मुलींच्या १४ वर्षे वयोगटात ज्ञानेश्री बागल, १७ वर्षे वयोगटात वेणुश्री मंगलारप व नक्षत्रा धामणे, तर १९ वर्षे वयोगटात श्रावणी भगत, सिद्धी खुरंगे व अनुष्का जाधव यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरमध्ये ३ आणि ४ ऑक्टोबरला आय एम ए वुमन्स डॉक्टर विंग चे राज्यस्तरीय परिषद

अहिल्यानगर- महिला डॉक्टरांच्या वैद्यकीय, सामाजिक आणि तांत्रिक क्षेत्रातील योगदानाला गती देण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन वुमन्स डॉक्टर्स विंग ( ) च्या वतीने ३ आणि ४ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर येथे राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. पॉईज, पर्पज अँड प्रोग्रेस या घोषवाक्यासह परंपरा जपत आधुनिकतेचा वेध घेणे ही या परिषदेची मुख्य संकल्पना आहे. या राज्यव्यापी अधिवेशनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून ४०० हून अधिक महिला डॉक्टर्स उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या परिषदेचे उद्घाटन ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ठीक ५:०० वाजता अरणगाव रोड येथील सोलिटेअर बाय बडी साजन येथे पार पडणार आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून आय. एम. ए.चे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी, भावी अध्यक्षा डॉ. मंजुषा गिरी आणि मा. खासदार डॉ. सुजयदादा विखे पा. उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. वैद्यकीय क्षेत्रात आणि जेन झीवर मंथन केले जाणार आहे.दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत केवळ वैद्यकीय विषयांवरच नव्हे, तर बदलत्या काळाची पावले ओळखून विविध महत्त्वपूर्ण विषयांवर परिसंवाद व चर्चासत्रे आयोजित करण्यात आली आहेत. यामध्ये स्त्री-आरोग्य, वैद्यकीय क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता () चा वापर आणि जेन झी ( - आजची तरुण पिढी) यांच्याशी संबंधित आरोग्य व मानसिकतेवर तज्ज्ञ डॉक्टरांचे विचारमंथन होणार आहे. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी २०२६ या परिषदेच्या अध्यक्षा डॉ. ज्योत्स्ना डौले, सचिव डॉ. सुमा वाघ व डॉ. प्रीती डूंगरवाल, डॉ. सोनल बोरुडे, परिषदेच्या मुख्य आयोजक डॉ. रेणुका पाठक, उपाध्यक्ष डॉ. संगीता कांडेकर व डॉ. पद्माकांती कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### भारतीय सेन समाजाच्या राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष व राजस्थान प्रभारी पदावर रमेश बनभेरू यांची निवड



अहिल्यानगर - भारतीय सेन समाजाच्या राष्ट्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष अहिल्यानगर येथील रमेश बनभेरू यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. भारतीय सेन समाजाची राष्ट्रीय कार्यकारिणी तथा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची बैठक छत्रपती संभाजी नगर येथील श्री विमलनाथ जैन मंदिराच्या प्रांगणात नुकतीच झाली. सेन समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. पुखराज राठोड आणि कार्यकारी अध्यक्ष दीपक जी सेन .यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत समाजहिताचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. रमेश बनभेरू भारतीय सेन समाजाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत होते. त्यांचे समाजासाठीचे कार्य आणि संघटन कौशल्य लक्षात घेऊन त्यांना राष्ट्रीय पातळीवर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.व त्यांच्या रिक्तपदावर दिलीप पवार रोहा रायगड जिल्हायांची निवड करण्यात आली .बुऱ्हानपूर येथील प्रसिद्ध साहित्यकार प्रातत्वविद सुभाष माने जी राष्ट्रीय उपाध्यक्ष नियुक्ती तसेच पळसुद मध्य प्रदेश येथील मनोज जी सेन मध्यप्रदेश अध्यक्ष नियुक्ती दिलीतसेच मोहनलाल चांगल प्रदेश सचिव नियुक्ती दिली महीला मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष पदी ज्योतिषाचार्य रेखाकिशोरी जगदीश टाक पंढरपुर यांची निवड करण्यत आली. रमेश बनभेरू यांनी सांगितले की, या बैठकीत बांधवगड (मध्यप्रदेश) येथे संत शिरोमणी श्री सेन महाराज यांचे भव्य स्यमारकमंदिर उभारण्याचा निर्धार करण्यात आला. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिक्षण व संघटनवर भर देत शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याच्या दृष्टीने सविस्तर चर्चा करण्यात आली.

# मंत्री नितेश राणे यांचा गुरुवारी पाहणी दौरा

**कामरगाव, ढोकी नं. २ व मांडमोहोळ तलावांची पाहणी; मत्स्यव्यवसायिकांशी संवाद – आमदार काशिनाथ दाते सरांची माहिती**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री ना. नितेश राणे हे गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असून, या दौऱ्यात पारनेरनगर विधानसभा मतदारसंघातील कामरगाव येथे आगमन करून कामरगाव, ढोकी नं. २ व मांडमोहोळ तलावांची पाहणी तसेच मत्स्यव्यवसायिकांसमवेत चर्चा करणार असल्याची माहिती पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली.

अधिकृत दौरा कार्यक्रमानुसार, मंत्री ना. नितेश राणे यांचा अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध कार्यक्रमांचा दौरा असून, त्यामध्ये सकाळी १२:०० वा. कामरगाव तलाव, ता. व जि. अहिल्यानगर येथे आगमन करून तलावाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार आहे. यावेळी स्थानिक मत्स्यव्यवसायिकांसमवेत चर्चा करून त्यांच्या समस्या, अडचणी तसेच मत्स्यव्यवसायाशी संबंधित विविध बाबींचा आढावा घेतला जाणार आहे. यानंतर मंत्री ना. राणे हे पारनेर तालुक्यातील ढोकी नं. २ तलावाकडे रवाना होणार आहेत. दुपारी ३.३० वाजता ढोकी नं. २ तलाव येथे आगमन व पाहणी होणार असून, याठिकाणीही मत्स्यव्यवसायासंदर्भात चर्चा करण्यात येणार आहे.

त्यानंतर सायंकाळी ४.०० वाजता मांडमोहोळ तलाव, ता. पारनेर येथे मंत्री ना. नितेश राणे रवाना होतील. सायंकाळी ४.३० वाजता मांडमोहोळ तलावाची पाहणी करून याठिकाणीही मत्स्यव्यवसायासंदर्भात चर्चा होणार आहे. अशाप्रकारे कामरगावपासून पारनेर तालुक्यातील ढोकी नं. २ आणि मांडमोहोळ या तलावांची पाहणी करून संबंधित भागातील मत्स्यव्यवसायाच्या परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा मंत्री ना. राणे घेणार आहेत. दरम्यान, मंत्री नितेश राणे यांच्या या दौऱ्यात दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शासकीय अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक देखील होणार आहे. दुपारी १.४० ते २.४० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे ही बैठक होणार असून, जिल्ह्यातील परिस्थितीचा प्रशासकीय स्तरावर आढावा घेतला जाणार आहे. पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरीक व विशेष करून या परीसरातील मच्छिमारांनी उपस्थित रहावे असे आवाहनही आमदार दाते सरांनी यावेळी केले आहे.

# राजकीय क्षेत्रात काम करतांना सामाजिक बांधिलकी पाळावे– शरद मरकड

**पद्मशाली समाजाचे वतीने तेलंगणा राज्याचे स्वीय सहाय्यक शरद मरकड यांचा सन्मान**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** तेलंगणा राज्याचे माजी मुख्यमंत्री व विरोधी पक्ष नेता मा. चंद्रशेखरराव यांचे स्वीय सहाय्यक शरदजी मरकड यांचा अहिल्यानगर पद्मशाली समाजाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी शरदजी मरकड यांनी तेलंगणा राज्याचे कार्या बाबत माहिती देऊन तेलंगणा राज्यामध्ये मा. चंद्रशेखर राव यांनी मुख्यमंत्री असताना जे काम केले ते काम संपूर्ण भारतात इतर कोणत्याही राज्यात झालेले नसुन आज सुद्धा विरोधी पक्षनेता म्हणून चंद्रशेखर राव यांचे कार्य तेलंगणामध्ये कौतुकास्पद आहे.

अहिल्यानगरमध्ये पद्मशाली समाज मोठ्या प्रमाणात असून पद्मशाली समाजाचे आराध्य दैवत श्री मार्कंडेय महामुनी यांचे मार्कंडेय मंदिराचे जिर्णोधाराचे काम सुरू असून त्यासाठी तेलंगणा राज्याच्या वतीने व मा. मुख्यमंत्री चंद्रशेखरराव यांच्या वतीने मोठे आर्थिक सहाय्य करण्याचा प्रयत्न करु , तसेच अहिल्यानगर मधील पद्मशाली समाजातील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय योजनेच्या माध्यमातून सहकार्य करु असे आश्वासन शरदजी मरकड यांनी दिले.

पद्मशाली पंच कमिटी न्याती समाजाचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा व श्री मार्कंडे देवस्थानचे अध्यक्ष गणेश विद्ये यांच्या हस्ते शरद मरकड यांचा यथोचित सन्मान करण्यात आला यावेळी पद्मशाली समाजाचे विश्वस्त विनोद बोगा, तिरमलेश पासकंटी, पुरुषोत्तम सब्बन ,सुनील नेटके ,हिंमत पडोळे, शिवाजी काकडे आदी उपस्थित होते .

# बेल्हे येथे छत्रपती शिवराय भेदिक शाहीरी राज्यस्तरीय मेळावा उत्साहात

**शाहीर शांताराम किनकर व शाहीर अण्णासाहेब चौरे यांना 'कै. आमदार धोंडीभाऊशेठ पिंगट स्मृती जीवनगौरव पुरस्कार' प्रदान**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**बेल्हे –** बेल्हे येथे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवराय भेदिक शाहीरी राज्यस्तरीय मेळाव्यात महाराष्ट्राच्या शाहीरी परंपरेचा जागर करण्यात आला. यावेळी सह्याद्री प्रतिष्ठान व सदनाना पतसंस्था यांच्या वतीने शाहीरी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे शाहीर शांताराम किनकर आणि शाहीर अण्णासाहेब चौरे सर यांना 'कै. आमदार धोंडीभाऊशेठ पिंगट स्मृती जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

या पुरस्कार वितरण सोहळ्याला शाहीरी क्षेत्रातील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. प्रदीपशेठ पिंगट, शाहीर स्वप्निल गायकवाड, शाहीर तानाजी माळवदकर, सुनील डुक्रे, शाहीर शिवाजीराव कवडे आणि शाहीर भरत थोरात यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. शाहीरी ही केवळ करमणुकीची कला नसून छत्रपती शिवरायांचा पराक्रम, महाराष्ट्राची संस्कृती, सामाजिक प्रबोधन आणि इतिहास जनमानसापर्यंत पोहोचविणारे प्रभावी माध्यम आहे. या परंपरेच्या जतनासाठी आणि शाहीरांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्याला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ज्येष्ठ शाहीरांच्या योगदानाचा गौरव करत त्यांच्या कलेला आणि कार्याला सलाम करणारा हा पुरस्कार सोहळा शाहीरी क्षेत्रासाठी विशेष अभिमानाचा क्षण ठरला.

# रिपब्लिकन पक्षाचा येत्या ३ ऑक्टोबर रोजी ६९ वा वर्धापन दिन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा- मा,बाबुराव कदम



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**छ,सभाजीनगर –** महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना दिनांक ३ ऑक्टोबर १९५७ रोजी नागपूर येथे झाली होती. यंदा रिपब्लिकन पक्षाचा ६९ वा वर्धापन दिन सोहळा येत्या ३ ऑक्टोबर रोजी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वात नवी मुंबई येथील विष्णुदास भावे सभागृह येथे आयोजित करण्यात आलेला आहे.या सोहळ्यास महाराष्ट्र तील आंबेडकरी जनतेने रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश कार्य अध्यक्ष बाबुराव कदम यांनी आज मरठवाडा दोरा प्रसगी केले सोबत मिलीद शेलके किशोर थोरात मा,महापोर बाल ईगले जिल्हा अध्यक्ष, ,राकेश पडीत विशाल सोनवने,,रवि जावले, विकास राउत,रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांच्या नेतृत्वात दरवर्षी दिनांक ३ ऑक्टोबर ला रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा केला जातो.यंदाही ३ ऑक्टोबर ला नवी मुंबईत रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन सोहळा ना. रामदास आठवले यांच्या नेतृत्वात साजरा होणार आहे.या सोहळ्यास महाराष्ट्र तुन हजारो च्या संख्येने रिपब्लिकन जनता उपस्थित राहणार असल्याची माहिती आज रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र कार्य अध्यक्ष बाबुराव कदम माहीती यांनी दिली.

# सायबर गुन्ह्यांपासून महिलांनी सावध राहावे

**बिडकीन पोलिसांसह महिला आर्थिक विकास महामंडळाची जनजागृती; डायल ११२चा वापर करण्याचे आवाहन**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण –** महिलांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचारासह वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून महिलांनी सावध राहावे, असे आवाहन महिला आर्थिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर आणि बिडकीन पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जनजागृती कार्यक्रमात करण्यात आले. मंगळवारी (दि. २९) सकाळी ११.३० ते १२ या वेळेत हा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी महिलांना कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी, लैंगिक छळ, विनयभंग यांसह महिलांशी संबंधित विविध कायदेशीर बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सोशल मीडियावर अश्लील संदेश अथवा फोटो पाठविणे, बदनामी करणे, फेक प्रोफाइल तयार करणे, मॉर्फ केलेले फोटो प्रसारित करणे आदी सायबर गुन्ह्यांबाबत माहिती देण्यात आली. डिजिटल व्यवहाराच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर सायबर चोरट्यांपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले. अनोळखी व्यक्तींना ओटीपी, पासवर्ड अथवा बँक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती देऊ नये, असे पोलिसांनी स्पष्ट केले. आपत्कालीन परिस्थितीत तातडीने डायल ११२ या क्रमांकावर संपर्क साधण्याची माहितीही महिलांना देण्यात आली. महिलांनी कोणत्याही प्रकारच्या अडचणीच्या प्रसंगी न घाबरता पोलिसांशी संपर्क साधावा आणि पोलीस प्रशासनासोबत समन्वय ठेवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# पैठणमध्ये गाढव चोरट्यांची आंतरराज्य टोळी जेरबंद

**१६ गाढव चोरीचा गुन्हा उघड; आंध्र प्रदेशातील सहा जणांना अटक, आहिल्यानगर गुन्हे अन्वेषण विभागाचीही महत्त्वपूर्ण भूमिका**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण –** पैठण शहरातून तब्बल १६ गाढवांची चोरी करून पसार झालेल्या आंतरराज्य टोळीचा पैठण पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात आंध्र प्रदेश राज्यातील सहा जणांना अटक करण्यात आली असून, या कारवाईमुळे गाढव चोरीचे प्रकरण चर्चेत आले आहे. दि. ५ ऑगस्ट रोजी मध्यरात्री पैठण शहरातून १६ गाढव चोरीला गेली होती. त्यानंतर पैठण पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली.

तपासादरम्यान या चोरीचा धागा आंध्र प्रदेशपर्यंत पोहोचला. संशयितांचा माग काढत पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणातील एका आरोपीला आहिल्यानगर गुन्हे अन्वेषण विभागाच्या मदतीने नाशिक कारागृहातून ताब्यात घेण्यात आले, तर आंध्र प्रदेशातील अन्य आरोपींनाही ताब्यात घेऊन त्यांना पैठण पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. आरोपींकडून गाढव चोरीच्या या गुन्ह्याबाबत अधिक माहिती मिळविण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. चोरीमागील नेमका उद्देश, चोरी केलेल्या गाढवांची विक्री कुठे करण्यात आली तसेच या टोळीचा यापूर्वी अशाच प्रकारच्या घटनांमध्ये सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पैठण पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या तपासाचे पैठण शहरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे. आंतरराज्य टोळीचा माग काढून आरोपींना जेरबंद केल्याबद्दल नागरिकांनी पोलीस निरीक्षक महादेव गोमारे तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या चौकशीतून गाढव चोरीच्या आणखी घटना उघडकीस येतात का, याकडे पैठण पोलिसांचे लक्ष लागले आहे.

# जागतिक पर्यटन दिनानिमित्त ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयात उत्साहात हेरिटेज वॉक

**अमूल्य ऐतिहासिक ठेव्याचे दर्शन घेत नागरिकांनी व्यक्त केली कृतज्ञता**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जागतिक पर्यटन दिनानिमित्त अहिल्यानगर येथील ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय व संशोधन केंद्रात आयोजित करण्यात आलेला हेरिटेज वॉक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. इतिहास, संस्कृती, कला आणि वारसा यांची ओळख करून देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक, इतिहासप्रेमी तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

''असेन मी... नसेन मी...
संग्रहालयात दिसेन मी...'' या भावनेतून उपस्थितांनी संग्रहालयातील ऐतिहासिक ठेवा पाहिला. संग्राहक पोपटकाका हळपावत यांनी संग्रहालयासाठी हस्तांतरित केलेल्या अमूल्य संग्रहाबद्दल उपस्थितांनी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. वैशिष्ट्यपूर्ण गारगोटी संग्रह, काष्ठशिल्पे, अडकित्ते, नाणी, विविध प्रकारची कुलूपे यांसह अनेक दुर्मीळ वस्तूंनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. निसर्गाची अद्भुतता आणि इतिहासाची समृद्ध परंपरा जपणाऱ्या या संग्रहातील पोपटकाकांचे योगदान सदैव स्मरणात राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

तसेच शब्बीर शेख यांनीही स्वतःकडे असणाऱ्या अनेक दुर्मिळ पुस्तकांचा ठेवा वस्तुसंग्रहालया साठी हस्तांतरित केल्याने त्यांनाही उपस्थितांनी धन्यवाद दिले.

संग्रहालयातील विविध तलवारी, ढाली, बंदुका, पगड्या, पोथ्या, हस्तलिखिते, चेन-लेस जर्मन बनावटीची सायकल, उत्खननात मिळालेल्या दगडी मूर्ती तसेच विविध गणेशमूर्तींचे दालन यांची उपस्थितांनी उत्सुकतेने पाहणी केली.

यावेळी सतिश गुगळे यांनी संग्रहालयासह आजूबाजूच्या ऐतिहासिक परिसराचा अभ्यासपूर्ण परिचय करून देत, तेथील इतिहास, वास्तू आणि सांस्कृतिक वारशाची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली . व्यवस्थापक नारायण आव्हाड यांनीही संग्रहालयातील विशेष आणि दुर्मीळ वस्तूंची रंजक माहिती सांगत हेरिटेज वॉक अधिक प्रभावी केला.

विशेष आकर्षण ठरलेल्या 'नगर दर्शन' गॅलरीमुळे अहिल्यानगर शहरातील विविध ऐतिहासिक वास्तू एकाच ठिकाणी पाहण्याची संधी उपस्थितांना मिळाली. तरुण वास्तुविशारद सुचित मुथा व मंदार खेले यांच्या संकल्पनेतून साकारलेली ही गॅलरी शहराच्या ऐतिहासिक वारशाचे प्रभावी दर्शन घडवते.

हेरिटेज वॉक यशस्वी करण्यासाठी पंकज मेहेर, श्यामभाऊ असावा, प्रफुल्ल पवार सर, स्वयंम बास्कर व स्वराज गुगळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी संग्रहालयाचे अभिरक्षक संतोष यादव, व्यवस्थापक नारायण आव्हाड, हेरिटेज वॉक सदस्य करीमभाई रामपूरवाला, आबिदभाई दुलेखान, पात्रे सर व ठाकूर परदेशी उपस्थित होते. तसेच प्रा.आनंद कटारिया, मनोज कदम यांच्यासह श्री शिवमुनीजी गुरुकुल शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

जागतिक पर्यटन दिनानिमित्त आयोजित या हेरिटेज वॉकमुळे ''आपला इतिहास जाणून घेऊया, आपला वारसा जपूया आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवूया'' हा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. सहभागी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# कष्टकार्यांच्या कुटूंबातील प्रत्येक सदस्यांच्या विकासासाठी पतसंस्था कार्यरत - अविनाश घुले

## स्व.शंकरराव घुले माथाडी कामगारांची सहकारी पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कष्टकर्यांच्या घामाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी हमाल पंचायतीच्यावतीने विविध उपक्रम हाती घेण्यात येत असतात. कष्टकार्यांची आर्थिक प्रगती व्हावी, कौटूंबिक उन्नत्तीसाठी स्व.शंकरराव घुले यांनी या कष्टकरी पतसंस्थेची स्थापना केली. त्यानंतर पतसंस्थेच्या माध्यमातून कष्टकर्यांचे जीवनमान उंचविण्यास मोठी मदत झाली. आज पतसंस्थेमुळे कष्टकार्यांचे आर्थिक सक्षमिकरण होत आहे. त्यांच्या गरजेवेळी पतसंस्था त्यांच्या पाठिशी उभी आहे. पतसंस्थेच्या माध्यमातून कष्टकर्यांचा होत असलेला विकास हेच पतसंस्थेचे मोठे यश आहे. कष्टकार्यांच्या कुटूंबातील प्रत्येक सदस्यांच्या विकासासाठी पतसंस्था कार्यरत आहे, तसेच या संस्थेत पारदर्शकपणा आहे. यासाठी सर्व सभासदांनी सभेला येणे गरजेचे आहे. जर आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहिलात तर सभासदांच्या हिताचे निर्णय सर्वांच्या सहमतीने घेण्यात येतात, तसेच संघटना राहिली तर आपण राहू यासाठी सर्वांनी एक राहणे महत्वाचे असे प्रतिपादन हमाल पंचायतीचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी केले.

स्व.शंकरराव घुले माथाडी कामगारांची सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सभा संपन्न झाली. यावेळी जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी मार्गदर्शन केले. या सभेस तज्ञ संचालक संजय घुले, चेअरमन रविंद्र भोसले, व्हाईस चेअरमन नवनाथ बडे, संचालक सुरेश मोहिते,आदिनाथ चेके, मच्छिंद्र दहिफळे, लक्ष्मण वायभासे, सागर पोळ, सौ.मंदाबाई सुर्यवंशी, रतनबाई आजबे, राम सरोदे ,सचिव बबनराव सुसे आदि उपस्थित होते.

यावेळी चेअरमन रविंद्र भोसले म्हणाले, गेल्या ३३ वर्षांपासून पतसंस्थेने कष्टकार्यांची समाजात पत निर्माण करण्याचे काम केले आहे. पतसंस्थेने कायम 'अ' वर्ग राखला असून, सर्वांना बरोबर घेत पतसंस्थेचा कारभार सुरु आहे. सभासदांचा अपघात विमा असून त्याचबरोबर सभासदांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी मदत व गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसेही दिली जातात. पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांच्या गरज पुर्ण होत असून, त्यांच्या जीवनात एक स्थैर्य निर्माण झाले आहे. तसेच यावेळी तातडीचे कर्ज मध्ये वाढ करण्यात आली असल्याचे यावेळी सांगण्यात आले .तसेच जो कर्जदार नियमित कर्जाची परतफेड करेल त्यास विशेष सवलत देणात येणार आहे . तरी आजही अनेक कष्टकरी पतसंस्थेचे सभासद नाही, त्यांनीही पतसंस्थेचे सभासद होऊन आपली प्रगती साधावी असे आवाहन केले.

प्रास्तविकात व्हाईस चेअरमन नवनाथ बडे यांनी पतसंस्थेचा आर्थिक ताळेबंद सादर केला. तसेच पतसंस्थेच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती देत. भविष्यात राबविण्यात येणार्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी सहकार प्रशिक्षण केंद्राच्या वतीने राजेंद्र बचाटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन हमाल पंचायत चे सचिव संजय महापुरे व प्रा गणेश भगत यांनी केले. तज्ञ संचालक संजय घुले यांनी आभार मानले.

या सभेस शहर सहकारी बँकेच्या संचालिका रेश्मा आठरे ,पुणे येथील प्रसाद तावसे ,सागर गायकवाड , हमाल पंचायतचे उपाध्यक्ष गोविंद सांगळे, मधुकर केकाण, शेख रजाक शेख लाल ,सचिव संजय महापुरे ,सतीश शेळके, सचिन ठुबे,यांच्यासह संस्थेचे कर्मचारी कोसार पठाण ,शाहूल वडागळे आदिंसह सभासद उपस्थित होते.

# जेन झी पिढीसाठी ज्येष्ठांचे अनुभवी मार्गदर्शन दिशादर्शक – शैलेश मुनोत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आताच्या काळातील जेन झी पिढीबाबत अनेकदा चर्चा होत असते. डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगातील या पिढीला आपल्या परंपरा, संस्कृती विषयी आत्मियता निर्माण व्हावी यासाठी ज्येष्ठांचे अनुभवी मार्गदर्शन महत्वाचे आहे. जैन श्रावक संघाचे उपाध्यक्षपद भूषविणारे तसेच प्रतिष्ठीत मर्चंटस बँकेचे माजी चेअरमन व विद्यमान ज्येष्ठ संचालक असलेले आनंदराम मुनोत अनेक वर्षांपासून सामाजिक, धार्मिक कार्यात सक्रिय आहेत. साधूसाध्वीजींच्या विचारांचा मोठा पगडा त्यांच्यावर असून ही शिकवण प्रत्यक्ष आचरणात आणण्याचाही ते कसोशीने प्रयत्न करतात. अतिशय मृदु व मितभाषी असलेले अण्णाशेठ युवा पिढीसाठी आदर्श आहेत. मंडळाच्या सदस्यांना वेळोवेळी त्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत असते. व्यवसाय करताना सामाजिक बांधिलकी कायम जपली पाहिजे अशी शिकवण ते कृतीतून देतात, असे प्रतिपादन नवीपेठे येथील जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी केले.

मर्चंटस बँकेचे ज्येष्ठ संचालक आनंदराम मुनोत (अण्णाशेठ) यांचा वाढदिवसानिमित्त मंडळाच्या वतीने अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. अंगारकी चतुर्थी निमित्त आनंदराम मुनोत यांच्या हस्ते मंडळाच्या चांदीच्या गणपती मूर्तीची पूजा व आरती करण्यात आली. याप्रसंगी मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, उपाध्यक्ष चेतन गुगळे, बाबालाल गांधी ,ललित बनबेरू, संदीप चोपडा ,हेमंत मुथा ,संजय ओसवालआदी उपस्थित होते.

आनंदराम मुनोत म्हणाले, नव्या युगाचा नव्या विचारांची तरूणाईच समाजात चांगुलपणा निर्माण करू शकते. विविध क्षेत्रात कर्तृत्वाने मोठे झालेले आणि समाजसेवेचा वसा घेतलेले सदस्य जय आनंद महावीर युवक मंडळात आहेत. त्यांचे कार्य मी अनेक वर्षांपासून पाहत आलेलो आहे. कोणत्याही सण उत्सवात ते समाजतील वंचित घटकांनाही आनंद मिळवून देत संतांची शिकवण आचरणात आणतात हे कौतुकास्पद आहे. रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करताना मंडळ विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. नुकताच मंडळाने पारंपारिक पद्धतीने गणेशोत्सव उत्साहात साजरा केला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्यावरील देखावाही गणेशभक्तांना प्रेरणा देणारा ठरला. मंडळाने केलेला सत्कार खूप आनंददायी आहे.

# गजराजनगर समस्यांबाबत आ.कर्डिले यांना निवेदन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील बुऱ्हाणनगर ग्रामपंचायत हद्दीतील गजराजनगर प्रभाग क्रमांक ५ चे सदस्य विशाल भाऊ सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली येथील नागरी समस्यांबाबत आज सकाळी (दिनांक ३०रोजी) नागरिकांच्या वतीने आ.अक्षयदादा कर्डिले यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात गजराज नगर मधील सर्व अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच महिलांना पाणी प्रश्न संदर्भात सातत्याने तोंड द्यावे लागते, याकडे त्यांचे लक्ष वेधले. कचरा गाडी वेळेत येत नसल्याने रस्त्याच्या बाजूला कचरा साचत असल्याने मोठा दुर्गंधीचा त्रास सर्वांना होत आहे. कचरा गाडी नियमितपणे आल्यास हा प्रश्न सुटेल, अशी मागणी नागरिकांनी यावेळी आ.कर्डिले यांच्याशी चर्चा करताना केली. नवीन महादेव मंदिरासाठी सभामंडपाची व्यवस्था करावी अशी महिलांनी मागणी केली. नागरिकांच्या या समस्यांबाबत मी स्वतः लक्ष घालून नियमित पाणीपुरवठा, कचऱ्याची समस्या तसेच अंतर्गत रस्त्यांचे लवकरच काम सुरु करून ते पूर्ण ही करू याबाबत कोणीही काळजी करू नये. मी स्वतः लक्ष घालून ही कामे मार्गे लावणार आहे.असे आ.अक्षय कर्डिले यांनी नागरिकांना सांगितले. त्यांच्या या उत्तराने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# श्री ढोकेश्वर महाविद्यालयात हिंदी दिवस समारोह उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**पारनेर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवस समारोह उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास अहमदनगर कॉलेजच्या हिंदी विभागाचे प्रा. डॉ. अशोक घोरपडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एकनाथ जाधव यांनी केले. त्यांनी हिंदी भाषेचे महत्त्व, हिंदी साहित्याची समृद्ध परंपरा तसेच विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचा दैनंदिन जीवनात प्रभावी वापर करण्याची गरज याविषयी मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी प्रा. डॉ. अशोक घोरपडे यांनी हिंदी भाषा व साहित्याच्या विविध पैलूंवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हिंदी ही भारतातील विविध भाषिक समुदायांना जोडणारी महत्त्वपूर्ण भाषा असून विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचे वाचन, लेखन आणि अध्ययन वाढवावे, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी हिंदी भाषेच्या संवर्धनाची आणि भारतीय भाषांप्रती आदराची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महादेव जपकार यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अभिषेक फंड यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हिंदी दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेविषयी अभिरुची निर्माण होऊन भाषिक व साहित्यिक जाणिवेला चालना मिळाली.

# कालिका देवी नवरात्रोत्सवासाठी महिला समिती सज्ज

## नवरात्रोत्सवात प्रबोधन, सांस्कृतिक स्पर्धा अन् दांडियाचा रंग; पुनम जैस्वाल अध्यक्ष, पूजा असोलकर उपाध्यक्ष



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक पैठण शहरातील रंगारहाट्टी गल्ली येथील सर्वांचे आराध्य दैवत श्री कालिका देवी नवरात्रोत्सवाची जोरदार तयारी सुरू झाली आहे. यंदाच्या श्री कालिका देवी नवरात्र उत्सव २०२६ साठी नवी महिला कार्यकारिणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली आहे.

यंदाचा नवरात्रोत्सव सामाजिक प्रबोधन, महिला सक्षमीकरण तसेच विविध कला व सांस्कृतिक उपक्रमांनी भव्य स्वरूपात साजरा करण्याचा संकल्प नवनिर्वाचित समितीने केला आहे.

उत्सव समितीच्या अध्यक्षपदी पुनम जैस्वाल, तर उपाध्यक्षपदी पूजा असोलकर यांची निवड करण्यात आली. सचिवपदी अश्विनी ठोंबरे, सहसचिव रंजीता दायमा, कोषाध्यक्ष श्रद्धा रावस, सहकोषाध्यक्ष प्रीती कुलकर्णी व वैशाली खीस्ती यांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

स्पर्धा प्रमुख म्हणून स्वाती साळुंके, तर स्पर्धा उपाध्यक्ष म्हणून कोमल तरटे यांची निवड झाली. दांडिया प्रमुखपदी पायल ठोंबरे, कल्पना परागे, अश्विनी लोंढे, सुवर्णा सारडा, भारती जव्हेरी व संगीता आखेगावकर काम पाहणार आहेत.

स्वागत प्रमुख म्हणून राणी गोजरे, संगीता चौधरी, स्वाती भारदे, अंकिता सराफ व स्वाती जाधव यांची निवड करण्यात आली. छायाचित्र व प्रसिद्धी समितीत सीमा मुळे, पूजा सराफ, कल्पना बीचुकले व रुपाली मोदाणी यांचा समावेश आहे. आरती नियोजनाची जबाबदारी राणी रावस, गीतांजली रावस व यामिनी सराफ यांच्यावर सोपविण्यात आली आहे. यंदाच्या नवरात्रोत्सवात महिलांसाठी विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धा तसेच पारंपरिक गरबा–दांडियाचे आयोजन करण्यात येणार आहे. देवीच्या दर्शनासाठी तसेच उत्सवातील विविध कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी पैठण शहरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नवनिर्वाचित महिला समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल १९७५ च्या बॅचचा तब्बल ५२ वर्षांनंतर स्नेह मेळावा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे न्यू इंग्लिश स्कूलच्या १९७५ च्या बॅचचा स्नेह मेळावा डीएसपी चौक,हॉटेल पंचवटीका येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. तब्बल ५२ वर्षांनंतर जुने वर्गमित्र,मैत्रिणी एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.याप्रसंगी बालमित्र व मैत्रीणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्नेह मेळाव्याच्या सुरुवातीला गेल्या ५२ वर्षात दिवंगत झालेल्या जुन्या मित्र–मैत्रिणींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीत, प्रतिज्ञा व शाळेतील प्रार्थना सौ रंजना पारखे, अंजली इनामदार भिसे, दीपा भालेराव देव यांनी म्हटली.

प्रास्ताविक करताना लक्ष्मीकांत झंवर म्हणाले की, १९७५ साली आपण शाळेच्या बाकावरून बाहेर पडलो आणि आज ५२ वर्षांनी पुन्हा त्याच बाकावर बसल्यासारखे वाटत आहे.या मेळाव्याचा उद्देश केवळ एकत्र येणे नाही तर आपल्या शाळेविषयी व शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा आहे.ज्या शाळेने आणि शिक्षकांनी आपल्याला घडवले त्यांची आयुष्यभर आठवण रहावी म्हणून सर्व मित्रांच्या सहकार्याने हा मेळावा होत आहे.

या स्नेह मेळाव्याला लक्ष्मीकांत झंवर,डॉ. पारस कोठारी,ज्ञानेश्वर रासकर, राजेंद्र देव,मिलिंद गांधी,सुधीर झालानी,दिपक खिस्ती, श्रेणिक कांकरिया,राजेंद्र मेहेर,ओमप्रकाश खंडेलवाल, विनायक कुलकर्णी,उपेंद्र कुलकर्णी,सुधीर खेर,प्रदीप कोठारी,प्रकाश देसरडा,प्रमोद राठोड,वाजीदीन इनामदार,प्रकाश गुंदेचा,अनिल आहेर, सुभाष खत्री,नितीन नागुलपेल्ली,रंजना पारखे,अंजली इनामदार,जयश्री कटरिया,महेंद्र चंदे,दशरथ गाडळकर,सुधाकर धोरपडे, गणेश भालेराव,जगन्नाथ बहिरवाडे,प्रदीप भंडारे,बजरंग भुतारे,सावळेराम गुंजाळ, रत्नाकर डोळसे,संजय गाडिलकर,मोहन फुलडहाळे, रामचंद्र जिंदम,शिवाजी सानप,सतिष सुरपुरिया, अशोक खंडेलवाल,अर्चना गांधी,श्रीकृष्ण जोशी,रमेश भोजवाणी,अजीत ताथेड,दिपा भालेराव, कमलाकर पाठक,मोरेश्वर मुळे,डुंगरवाल आदी उपस्थित होते.

आपले मनोगत व्यक्त करताना सुधीर झालानी म्हणाले,आज आपण सगळे ६५–७० वर्षांचे झालो आहोत,कोणी निवृत्त झाले,कोणी व्यवसायात आहे,पण मनाने आजही आपण न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थीच आहोत.काळ कितीही पुढे गेला तरी बालपणीची मैत्री कधीच जुनी होत नाही.आपण मिळून शाळेसाठी आणि समाजासाठी काहीतरी चांगले करूया.पुढील वर्षी पुन्हा नक्की भेटूया,असा शब्द सर्वांनी दिला.

ज्ञानेश्वर रासकर म्हणाले, यंदाच्या गणेशोत्सव काळात माळीवाडा येथील नगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात मी स्वतः पुढाकार घेऊन आपल्या सर्व मित्र मैत्रिणींना सहपरिवार निमंत्रण देऊन सर्वांसह गणपती बाप्पांची महाआरती केली.

(पान १ वरून)

## नेत्यांच्या बोलण्यात एकसूत्रता नसल्याने अर्ज घेण्यास गर्दी

करताना ते म्हणाले, या सर्व गोष्टींचा सारासार विचार करूनच मी फॉर्म घेतलेला आहे. त्याबाबत आणखी विचार करूनच आता तो फॉर्म भरणार असल्याचे स्पष्ट करून प्रा. शिंदे म्हणाले, अनेक कारखान्यांवर कोट्यवधी रुपयांचं कर्ज असल्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेतील. सहकार क्षेत्रामध्ये मी पहिल्यांदाच निवडणूक लढवत आहे. त्याबाबत मला जास्त काही माहिती नाही. ज्यांच्या कारखान्यावर कर्ज आहे, त्यांच्या कारखान्याबाबत तुम्ही त्यांना विचारा. मी कुठल्याही संस्थेचा थकबाकीदार नाही, असेही प्रा. शिंदे यांनी आवर्जून स्पष्ट केले. दरम्यान, माझ्या मनधरणीचा प्रश्न येत नाही. नेत्यांनी त्याबाबत बोलले पाहिजे. मी काही बोलू शकत नाही. संगमनेरमध्ये बैठक झाली आणि त्यामध्ये बिनविरोध करण्याचा निर्णय झालेला असेल. मात्र, असे असले तरी सभासदांनी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज घेतले आहेत. यावरून बिनविरोध होणार की नाही, हे स्पष्ट होतं, असे सूचक भाष्यही त्यांनी केले.

## मोहटादेवी नवरात्रोत्सवासाठी प्रशासन सज्ज

असल्याने पाथर्डी आगाराच्या वतीने २४ तास जादा बससेवा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले. भाविकांसाठी सुलभ दर्शन व्यवस्था तसेच आवश्यक ठिकाणी ये–जा करण्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

**अनुपस्थित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस**

बैठकीस अनुपस्थित राहिल्याबद्दल वनपरिक्षेत्र अधिकारी, अन्न व औषध प्रशासन विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग आणि गटविकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी दिले. बैठकीस तहसीलदार उद्धव नाईक, सहायक पोलिस निरीक्षक रोहन खंडागळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सय्यद, महावितरणचे उपअभियंता अरविंद कुकडे, विविध शासकीय विभागांचे अधिकारी, देवस्थानचे विश्वस्त शशिकांत दहिफळे, अशोक दहिफळे, ॲड. विक्रम वाडेकर, बाळूशेट लाहोटी, बाबासाहेब दहिफळे, सरपंच मनीषा पालवे, पाथर्डी तालुका प्रेस क्लबचे पत्रकार, देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, लेखापाल संदीप घुले यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक ॲड. विक्रम वाडेकर यांनी केले, तर आभार ईश्वर गायकवाड यांनी मानले.

## श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट आयोजित छत्रपती शिवाजी महाराज कथा सोहळ्याचा आ. संग्रामभैय्या जगताप यांच्या

### प्रमुख उपस्थितीत शानदार शुभारंभ

हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्याचे स्वप्न उराशी बाळगले म्हणून १९ फेब्रुवारी १६३० या सुदिनी शिवनेरी गडावर शिवबांचा जन्म झाला. जिजाबाईंनी शिवबांवर जे गर्भसंस्कार केले ते शिवरायांना अखंड स्फूर्ती देत राहिले. बाल शिवाजींनी संस्कृत भाषेत प्रकाशित केलेली राजमुद्रा त्यांना संस्कृतचे उत्तम ज्ञान होते, हेच सांगते. जिजाबाईसह दादोजी कोंडदेव, सोनोपंत डबीर या गुरूंनी बाल शिवाजींना घडविण्यात दिलेले योगदान लक्षवेधी आहे. आक्रमकांनी १६३० साली उद् ध्वस्त केलेले पुणे परत वसवण्यासाठी बाल शिवाजीने वयाच्या सहाव्या वर्षी सोन्याच्या फाळांनी नांगरत कसबा गणपतीची प्रतिष्ठापना केली. त्यांची आज्ञापत्रे प्रगल्भ अभ्यासाचे दर्शन घडवतात, असे स्वामी गोविंददेव गिरीजी महाराजांनी सांगितले.

सर्वश्री शरद झंवर, रामेश्वर बिहाणी, हिरालाल पटेल, डॉ. शरद कोलते, विनोद पटेल, पुरूषोत्तम नावंदर, दत्ता जाधव, सौ.मंगल जाधव, सौ.सुवर्णा जाधव आदी मान्यवरांसह शहरातील आणि उपनगरातील हिंदू धर्म प्रेमी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

## विळद घाटातील वृध्दाश्रमात वृध्दांची हत्या करणारा आरोपी अटकेत

सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अजय कौटे, खिळदकर, सहाय्यक फौजदार राकेश खेडकर,हवलदार फोलाने, राजेंद्र सुद्रीक, पालवे फुंदे, सुरज देशमुख, आदींनी केली आहे.

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीत संजय कुमार कर्नावट यांचा अर्ज दाखल

सेलचे पारनेर तालुका उपाध्यक्ष सभाजीराव गागरे यांच्यासह समर्थक उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बोलताना संजय कुमार कर्नावट यांनी बिगर शेती संस्था मतदारसंघातील गेल्या पाच वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न सर्वांना सोबत घेऊन जिल्हा बँकेच्या माध्यमातून मार्गी लावण्याचा आपला प्रयत्न राहील, अशी भूमिका मांडली. सहकार क्षेत्रासोबतच सामाजिक क्षेत्रातही कर्नावट कुटुंबाचे योगदान राहिले आहे. त्यांचे सुपुत्र प्रसाद दादा कर्नावट हे पारनेर तालुका जैन संघटनेच्या माध्यमातून सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत असून सामाजिक कार्याची परंपरा पुढे नेत आहेत. बिगर शेती संस्था मतदारसंघातून कर्नावट यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने या मतदारसंघातील निवडणुकीकडे आता सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.